International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor – 7.328
Vol.8 No.3 Jan – Feb 2021

# पंडित जितेंद्र अभिषेकींनी संगीतबद्ध केलेल्या नाट्यपदांतील सांगीतिक आकृतिबंधांचा अभ्यास

**शर्वरी विनोद डिग्रजकर**

संशोधक विद्यार्थी
संगीत व नाट्यशास्त्र विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**गोषवारा:**

भारतीय संगीतपरंपरा ही अनेक सांगीतिक आकृतिबंधानी समृद्ध आहे.ध्रुपद-धमारापासून ते अगदी ओव्यांपर्यंत अनेक आकृतिबंध मराठी नाट्यसंगीतात वापरलेले दिसून येतात. ख्याल, तराणा, ठुमरी, कजरी, होरी, गझल, कव्वाली, लावणी, साकी, दिंडी, आर्या, अभंग असे अनेक प्रकार मराठी नाट्यपदांच्या चाली बांधताना वापरलेले दिसून येतात. गंधर्वोत्तर काळामधील प्रतिभासंपन्न संगीतकार पंडित जितेंद्र अभिषेकी यांनी मराठी संगीत नाटकांचे संगीत देताना अनेक लक्षवेधक प्रयोग केलेले दिसून येतात. त्यांनी संगीतबद्ध केलेल्या पदांमध्ये पारंपारिक बंदिशींचा ताजातवाना संदर्भ सापडतो.तर काही रचना या स्वतंत्र रचना म्हणून दर्जाप्राप्त आहेत. धानी,बिहागडा, सालगवराळी अश्या अनेक अनवट समजल्या जाणाऱ्या रागांचा वापर त्यांनी नाट्यपदांच्या चाली बांधताना केला. त्याचबरोबर भावगीताच्या,गझल च्या अंगाने जाणाऱ्या चाली त्यांनी बांधल्या. या चालींच्या रचनेमध्ये कुठेही सांगीतिक फाफट पसारा न्हवता, तर आटोपशीरपणा होता. पं.जितेंद्र अभिषेकी यांनी जवळपास सतरा किंवा त्यापेक्षा जास्त नाटकांना संगीत दिले. या सर्व नाटकांमध्ये चालींची वैविध्यता दिसून येते. भारतीय संगीतामध्ये जे सांगीतिक घाट आहेत त्यांचा वापरअभिषेकींनी मराठी नाट्यपदांच्या चाली बांधतानाकसा केला आहे, त्यांचे सांगीतिक सौंदर्य, लयबद्धता यांचा अभ्यास सदर संशोधनात केला आहे

**प्रस्तावना व परिचय:**

महाराष्ट्राच्या संगीताची स्वत:ची अशी एक वेगळी ओळख आहे. हे संगीत लावणी, अभंग, भारूड, शाहीरी, किर्तन प्रकार तसेच विविध लोकगीते अश्या अनेक सांगीतिक प्रकारांनी समृद्ध असे

संगीत आहे. त्याचबरोबर १८४३ सालापासून म्हणजे सांगलीच्या विष्णुदास भावे यांच्या'सीता स्वयंवर' या नाट्य प्रयोगापासून 'संगीत नाटक' किंवा 'महाराष्ट्राची संगीत रंगभूमी' हे वेगळे वलय महाराष्ट्राला लाभले आहे.

जेव्हा बोलपटाचा काळ सूरू झाला त्यावेळीही त्या चित्रपट संगीतावर नाट्यसंगीताचाच प्रभाव दिसून येतो. संगीत नाटकामध्ये कथानकापेक्षा त्यातील संगीताला, गायकीला जास्त महत्व प्राप्त झाले होते. नाट्यापदांना आळवून आळवून म्हणण्याच्या पद्धतीमुळे व वन्समोअर मुळे नाटके दिर्घकाल म्हणजे रात्र रात्र चालत असत. परंतु तो काळ थोडा संथ व निवांत होता. पण काळ जेव्हा हळू हळू गतिमान झाला तसा या संगीतनाटकांचा सादरीकरण कालावधी मोठा व अधिक वाटू लागला आणि त्यावेळी संगीत नाटकांची परंपरा पुढे चालू ठेवण्यासाठी आटोपशीर पणाची गरज जाणवू लागली. नाटक तीन साडेतीन तासामध्ये संपण्यासाठी त्यातील गाण्यांची संख्या, गायकी ही मर्यादित असणे आवश्यक होते. ही महत्वाची बाब लक्षात घेऊन पंडित जितेंद्र अभिषेकी यांनी संगीत नाटकातील नाट्यपदांना संगीत देण्याची किमया साधली. यासाठी त्यांनी जे गायक किंवा गायिका निवडल्या त्यांच्यावर ते पद ठराविक वेळेपर्यंत व ठराविक ताना व आलापांनी गायचे असे जणू बंधनच घातल्याचे दिसून येते. त्यामुळे संगीत नाटके तीन साडेतीन तासात संपू लागली. ढंगदार चाली, या चालींसाठी वापरले गेलेले वैविध्यपूर्ण राग आणि आकर्षक मुखडा व अनपेक्षित वळणाने जाणारा अंतरा यामुळे अभिषेकी बुवांनी संगीत नाटक व नाट्यपदांच्या चालींमध्ये मन्वंतर घडविले. असे असले तरी पंडित अभिषेकी यांनी अगोदरची संगीत नाट्यपरंपरा अमान्य केली नाही. उलट त्या पूर्वसूरीच्या छायेमध्येच या नवीन चाली घडल्या हे त्यांनी नमूद केले आहे. ते म्हणतात "मला स्वत:ला पूर्वीच्या नाटकातील गाणी विशेष आवडतात. रस व भावपरिपोषाच्या दृष्टीने या नाट्यगीतात मोठी ताकद दिसून येते. विशेषत: किर्लोस्कर व देवल या दोन्ही नाटककारांना संगीताची बैठकच होती असे मला पावलोपावली दिसून येते या दोन्ही नाटककारांच्या प्रत्येक पदापूर्वीचा गद्य भाग कुणीही जरूर न्याहाळावा. आजच्या नाटककारांनी तर जरूरच. पदाची बांधणी केल्यानंतर त्या त्या पदाच्या नादमाधुर्याच्या व जडणघडणीच्या अंगानेच वरील दोन्ही नाटककारांचे संवाद फुलत जातात.पुढे येणाऱ्या पदाची लय पहिल्या गद्यात साहजिक ओघाने उभी केली गेली आहे. पूर्वीच्या नाटकात ज्या लोकांनी संगीत दिले ते फक्त संगीतदिग्दर्शक नसून स्वत: गायक होते. त्यामुळे साहजिकच

त्या त्या गीतातील नाट्याभिनिवेष त्यांना स्वतःला अभिप्रेत झाल्यानंतरच त्यांनी चाली सिद्ध केल्या. आम्ही जे काही आज करतो त्यामागे या पूर्वसूरींची छाया उभी आहेआणि या छायेतच आम्ही वावरत आहोत."

**संशोधनाची उद्दिष्टे:**

१. पंडित जितेंद्र अभिषेकी यांच्या नाट्यपदांच्या चालींचा भारतीय संगीतातील सांगीतिक आकृतीबंधांच्या आधारे वेध घेणे

२ . नाट्यपदांच्या चाली, गायकी आणि त्यातील साहित्यिक दृष्टीकोन अभ्यासणे

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत संशोधन हे द्वितीय तथ्य संकलनावर आधारलेले आहे यासाठी विविध ग्रंथ, स्मरणिका तसेच ध्वनिमुद्रणे यांचा वापर केला आहे.

**अभिषेकींनी संगीत दिलेली संगीत नाटके व त्यातील नाट्यपदे:**

पं.अभिषेकी यांनी सुप्रसिद्ध लेखक व नाटककार वसंत कानेटकर यांच्या मत्स्यगंधा, लेकुरे उदंड झाली, मीरा मधुरा, कधीतरी कोठेतरी अश्या एकूण चार नाटकांचे संगीत दिग्दर्शन केले. त्यांचे संगीत असलेले 'धी गोवा हिंदू असोशिएशन' या संस्थे तर्फे 'मत्स्यगंधा' हे पहिले नाटक रंगभूमीवर आले. या नाटकाचा पहिला प्रयोग १ मे १९६४ रोजी मुंबईच्या बिर्ला मातोश्री सभागृहात झाला.

मत्स्यगंधा नाटकातील सुरवातीची जी नांदी आहे त्याचे शब्द स्वतः अभिषेकींचे आहेत.

ॐकारमय वाणी | श्रीकार गुण खानी ||

जल तेज नभ धरणी | मन बुद्धि पद पाणी ||

शक्ती शिवा भेद | षड्शास्त्र श्रुती देत ||

लय एक वच भेद | स्थिर अचल हे प्राणी ||

हंसकिंकीणी रागामध्ये दोन गंधार एकापाठोपाठ योजून एक उत्तम परिणाम अभिषेकींनी या नांदीच्या चालीमध्ये साधला आहे.

ज्या गाण्याने नाट्यसंगीतात क्रांती केली असे या नाटकातील सुरूवातीचे गाणे म्हणजे 'देवा घरचे ज्ञात कुणाला?' हे होय. सुप्रसिद्ध गायक रामदास कामत यांच्या आवाजातील हे ध्वनीमुद्रित पद खूप

गाजले व लोकप्रिय ठरले आहे. देवाघरचे या शब्दावरील तानेने सुरू होऊन 'ज्ञात कुणाला?' मधील 'ज्ञा' अक्षरावर म्हणजे तीव्र मध्यमावरील वैशिष्ट्यपूर्ण सम हे या गाण्याचे महत्वाचे लक्षण ठरले आहे खरे पहाता बालगंधर्वांच्या 'नाथ हा माझा मोही खला' मधील सुरुवातीची तान हीच 'देवाघरचे ज्ञात कुणाला?' ची प्रेरणा असावी. त्याच बरोबर यमन रागातील 'आओ आओ आओ बलमा' बंदिशीच्या सुरवातीच्या तानेमध्येही या पदाची काहीशी बिजे आढळतात. पण जरी प्रेरणा किंवा कोणत्याही रचनेमध्ये बिजे आढळत असली तरी अभिषेकींनी एकूण पदाची जी बांधणी केली आहे ती अनोखी आहे. त्यामध्ये कुठेही रटाळता नाही. पूर्ण उत्साहाने भरलेले व आटोपशीर असे हे पद आहे.

'मी निष्कांचन निर्धन साधक
वैराग्याचा एक उपासक
मनात माझ्या का उपजावे संसाराचे प्रेम?

यातील शेवटचा आनकलनीय प्रश्न व यासाठी वापरलेली स्वररचना, यावरून बुवांच्या संगीत देण्याविषयीच्या व्यापक दृष्टीची साक्ष आपल्याला पटते. प्रसिद्ध समिक्षक श्रीरंग सांगोराम लिहितात की "'देवा घरचे ज्ञात कुणाला? या पदाच्या यमन रागातील चालीमधली तीव्र मध्यमावरील सम ही साठोत्तर युगातील तीव्र संवेदनाच्या सुगम संगीताची एक परिचयात्मक खूणठरली. याच नाटकामध्ये त्यांनी 'गर्द सभोवती, तव भास अंतरा, अर्थशून्य भासे मज' या भावगीतांना ज्या चाली दिल्या त्यांची गोडी आणि ताजेपणा अजूनही सरलेला नाही. नाट्यसंगीतातील या सुगम रचनांना त्यांनी सर्वसामान्य भावगीतापेक्षा नाट्यानुकूल अशी वेगळी प्रकृती बहाल केली आहे. या रचनांमध्ये एक अतिसुंदर संदर्भसापेक्षता व लययोजना त्यांनी सांभाळलेली आहे आणि त्यांचा'कस' नेहमीच्या भावगीतांपेक्षा गडद ठेवला आहे. नाट्यसंगीतात शब्द आणि सूर यांचा एकमेकांशी संबंध जुळवताना गीतातील रसभाव आणि स्वरसंयोजन यात परस्परपूरकता निर्माण करण्यात अभिषेकीजींना जे यश मिळाले आहे त्याचे अंशात्मक श्रेय त्यांच्या महाविद्यालयीन साहित्य संस्काराला देण्यास हरकत नसावी!

याच नाटकातील 'नको विसरू संकेत मिलनाचा' हे पद खरे तर 'दिंडी' आहे. परंतु ही किर्लोस्करांच्या नाट्यपरंपरेची आठवण करून देणारी असली तरी अभिषेकी बुवांनी त्यामध्येही नाविण्य आणले आहे. "दिवस मावळताना प्रियेला बोलावणाऱ्या या पदाची रचना सायंगेय-परमेलप्रवेशक

'मुलतानी' रागात आहे....सायंगेय मुलतानीमुळे संध्याकाळच्या वेळाची छाया प्रेक्षकांवर आपोआपच येते या पदाची रचना द्रुत एकतालात आहे. द्रुत एकतालामुळे प्रणयातुर पराशराच्या मनाचा अधीरपणा व्यक्त होतो व नको विसरू इथे सम ठेवल्यामुळे मिलनाचा संकेत प्रियेने विसरू नये असा त्याचा उत्कट भाव आहे, तो परिणाम साधतो.'

मत्स्यगंधा नाटकातील सर्वच पदे अविट गोडीची आहेत. 'गुंतता हृदय हे' हे दादरा अंगाने जाणारे पद या नाटकात खूप वेगळ्या विचाराने मांडले आहे या पदाबद्दल पंडित राजा काळे लिहितात की "गुंतता हृदय हे' ला खमाज गारा या रागाची पार्श्वभूमी लाभली आहे. अभिषेकीबुवांची उपशास्त्रीय संगीताची आवड, ठुमरी, दादरा, टप्पा, लोकसंगीत, तसेच पारंपरिक साकी, दिंडी व त्यातून जतन केलेल्या अनेक रचनांचे सांगीतिक धन अंतर्मनात असल्यामुळे'गुंतता हृदय हे' मधील सुरावट ही वेगळे लेणे ल्यालेली झाली आहे. त्यातील काव्य, ठेका, लय व अभिषेकी-परीसस्पर्श यामुळे ही रचना आपले वेगळेपण राखून आहे. वैश्विक सत्य बदलत नाही. तशीच चांगली सांगीतिक मूल्येही वेगवेगळ्या कालखंडात वेगवेगळ्या काव्यांतून आणि रूपांतून आपले अस्तित्व पुनर्स्थापित करत असतात"

'तव भास अंतरा झाला', 'गर्द सभोती रान साजणी', अर्थशून्य भासे मज हा' ही भावगीत अंगाने जाणारी पदे आहेत. अभिषेकींनी केवळ भावगीतांची रचना करून बघावी म्हणून या चाली केल्या नाही, तर नाटकामध्ये अनुषंगीक पात्राच्या मनाची अवस्था, परिस्थिति यातून निर्माण होणाऱ्या भाव-भावनांचा पूर्ण विचार करून या भावगीत किंवा ठुमरी अंगाने जाणाऱ्या चाली त्यांनी केल्या. कदाचित काव्य समोर आल्यावर नाटकातील कोणत्या पात्राच्या तोंडी आहे आणि नाटकाचा किंवा प्रसंगाचा आशय काय आहे हे लक्ष्यात घेऊन आपोआप स्फुरलेल्या चालीचे रूपांतर भावगीतात झाले असेल किंवा आपण रसग्रहणाच्या दृष्टीने त्यांना भावगीत म्हणत असू. दुसरी गोष्ट म्हणजे या चालींमधील प्रत्येक अंतरा वेगवेगळ्या चालींमध्ये बांधला गेला आहे. सुप्रसिद्ध नाटककार वसंत कानेटकर लिहितात की "एक गीत बांधत असताना जितेंद्र सहसा दोन अंतऱ्यांचं गीत बसवतात तिसरा अंतरा काढूनही टाकला जातो आणि दोन्ही अंतऱ्याच्या चाली वेगवेगळ्या असतात. कल्पनासुद्धा येत नाही की, पुढचा अंतरा कोणत्या चाली घेऊन येणार आहे. ' साद देती हिमशिखरे' मधील पहिला अंतरा झाल्यानंतर जेव्हा दुसरा अंतरा येतो,तेव्हा ऐकणारे एकदम चकित झाल्यासारखे होतात,' स्वप्न रंगले रात्री' हा अंतरा एकदम वेगळ्या स्वरुपात समोर

येतो. किंवा 'तव भास अंतरा झाला' मधील शेवटचा भाग 'वाहत ये झूळझूळ वारा' याची चाल वेगळी येते. अभिषेकी म्हणाले होते, 'तव भास अंतरा झाला',मन रमता मोहना' यातील चाल 'विलोपले मधु मीलनात या' पदासारखी आहे. आपण कुठून काय घ्यायचे आहे याची अतिशय सुंदर जाण अभिषेकींना आहे."

'अर्थशून्य भासे मज हा कलह जीवनाचा' या पदामध्ये 'अर्थशून्य' हा भाव 'भटियार' या रागातून अतिशय अर्थपूर्ण व्यक्त झाला आहे. संगीतकार यशवंत देव लिहितात की "नाट्यसंगीतात सुगम संगीतासारख्या सोप्या भावमधुर चाली आल्या तरी त्या पदांचा रंगभूमीवरचा आविष्कार करताना ते केवळ भावगीत-गायन होऊ नये. त्याचप्रमाणे ठुमरी सदृश चालींचा आविष्कार तमाशातल्या लावणीप्रमाणे चटक मटक असता कामा नये. ह्या दृष्टीने विचार केला तर मराठी रंगभूमीवरचे नाट्यसंगीत एक वेगळेच रसायन आहे असे आपल्या लक्षात येईल. अभिषेकींच्या रचनांचे महत्वाचे वैशिष्ट म्हणजे त्यांनी चाली बांधताना रागदारी संगीताची कधीही साथ सोडलेली दिसत नाही. वासवदत्ता नाटकातील 'तुझा गे नित नूतन सहवास' ही यमन रागातील प्रसन्न अशी अभिषेकींची चाल. ही चाल सुद्धा 'करीम करतार' या बंदिशीच्या संदर्भाने आलेली आहे. अभिषेकी बुवांच्या चाली या मागील संदर्भाने आलेल्या जरी असल्या तरी त्यामध्ये बुवांनी केलेला सौदर्यपूर्ण विचार,नाविण्य यांनी भरपूर आहेत त्यांनी देवगंधार, जोगकौंस, बिहागडा, नंद, धानी, मधुरंजनी, सालगवराळी, सरस्वती, श्री, हेमंत, सूर्यकौंस, संपूर्ण मालकौंस, अमृतवर्षिणी, गुणक्री, गावती, देवता भैरव, ललत पंचम या आणि अश्या अनेक प्रचलीत-अप्रचलीत, नवनिर्मित रागांमध्ये अभिषेकींनी चाली बांधल्या. कधी कधी काव्यानुसार रागचलनामध्ये बदलही केले. परंतु त्यातील प्रासादिकता, सुगमता, अविट गोडी कायम ठेवली. त्यातील गायकीचा पसाराही कमी ठेवला, सिमित ठेवला.

अभिषेकींच्या नाट्यसंगीतात एकाच पदांमध्ये अनेक राग व अनेक ताल वापरल्याचे पहायला मिळते. 'कट्यार काळजात घुसली' या नाटकातील 'सूरत पियाँ की' या पदामध्ये सोहोनी, मालकौंस, जौनपूरी, केदार,मल्हार, भूप, बसंत हे राग तर त्रिताल, एकताल, झपताल हे ताल वापरले आहेत. याच नाटकातील खाँसाहेब आणि पंडितजी यांच्या भिन्न गायकी दाखविण्यासाठी 'घेई छंद मकरंद' या पदाची अभिषेकींनी अनुक्रमे 'धानी' आणि 'सालगवराळी' या रागांमध्ये रचना केली आहे. शिवाय हया पदांसाठी

द्रुत त्रिताल व झपतालाचा वापर केला आहे. 'कट्यार काळजात घुसली' या नाटकातील रागमाला, या भवनातील, दिन गेले भजनाविण सारे, मुलतानी, पुरीया धनाश्री रागातील बंदिशी, कव्वाली अश्या विविध प्रकारांनी, पदांनी 'कट्यार' चे संगीत रसिक मनावर अधिराज्य केले आहे. 'लागी कलेजवाँ कट्यार' ही ठुमरीची रचना अभिषेकींच्या स्वत:च्या आवाजात ऐकताना भावनेचा आवेग व आर्ततेचा सुंदर अविष्कार करते. हीच प्रचिती त्यांच्याच आवाजातील व त्यांनीच संगीतबद्ध केलेल्या 'हे बंध रेशमाचे नाटकातील 'पथ जात धर्म' या चाली मध्ये येते. अलीकडेच प्रसिद्ध अभिनेता व चित्रपट दिग्दर्शक सुबोध भावे यांनी 'कट्यार काळजात घुसली' या नाटकाचा बनविलेला बायोपिक किंवा चित्रपटाद्वारे, कथेबरोबरच अभिषेकी बुवांच्या संगीताची नवीन पिढीला भुरळ पडत असल्याचे दिसून आलेवर उल्लेख केल्याप्रमाणे या चित्रपटात बुवांच्या आवाजातील 'लागी कलेजवाँ कटार' ही ठुमरी एक भावनिक असर रसिकांच्या मनावर सोडून जाते.

कट्यार नाटकाची सुरवात ही भैरवी रागापासून होते मैफिलीच्या शेवटी गायल्या जाणाऱ्या भैरवीचा वापर नाटकाच्या सुरवातीला होणे हे बुवांचे वेगळेपण होते. या बद्दल अभिषेकी म्हणतात की "तसं पाहिलं तर भैरवीचा आपल्याकडे राग म्हणून सांगीतिक विचार झालाच नाही. पूर्वीच्या काळी संगीत नाटकं रात्र-रात्र चालायची. नाटक पहाटे पहाटे संपायचे, त्यामुळे एखाद दुसऱ्याभैरवीची जागा असायची. पुढे बैठकीचं गाणं देखील भैरवीनं संपवण्याची प्रथा पडली. उत्तरेत भैरवीनं गाणं संपवत नाहीत. आपल्याकडे संगीत नाटकानं हा प्रघात पडला." थोडक्यात 'कट्यार काळजात घुसली' नाटकातील त्या सुरुवातीच्या प्रसंगाला, भावनेला भैरवी रागाची आवश्यकता होती.

ययाती देवयानी या नाटकातील 'तम निशेचा सरला' ही भैरवी, संत गोरा कुंभार नाटकातील 'कैवल्याच्या चांदण्याला', निर्गुणाचा संग, अवघे गरजे पंढरपूर, पाहू द्या रे मज,केशवाचे भेटी, कधीतरी कोठेतरी नाटकातील 'परब्रह्म भेटीलागी', हे बंध रेशमाचे नाटकातील 'काटा रुते कुणाला' हे गझल अंगाने जाणारे पद, दैव किती अविचारी, ययाती देवयानी नाटकातील 'हे सूरांनो चंद्र व्हा' 'मीरा मधुरा' नाटकातील 'तुझ्या अंगसंगानें, स्वप्नात पाहिले जे, 'धाडीला राम तिने का वनी?' नाटकातील 'घाई नको बाई अशी', 'लेवू कशी वल्कला', कधी भेटेन वनवासी, मंद,मंद ये समीर अशी एक ना अनेक पदे अभिषेकी बुवांनी आपल्या चालींनी व गायकीने अजरामर केली आहेत सुप्रसिद्ध गायिका आशा

खाडीलकर लिहितात की " मुंबई मराठी साहित्य संघाच्या 'धाडीला राम तिने का वनी?' या नाटकात मी सीतेची भूमिका करायचे ठरले आणि या नाटकाला पंडितजी संगीत देणार हे मला कळल्यावर माझ्या आयुष्यातले एक स्वप्न पूर्ण होणार या आनंदाने मी फुलून गेले मला त्या नाटकातील पद शिकवताना बुवा ज्या सहजपणे चाली बांधत आणि स्वरांच्या विविध संवेदनांचे आणि गहराईचे दर्शन घडवीत त्याला केवळ तोडच नाही. त्यातील सर्वच पदे एक वेगळाच गंध घेऊन आलेली होती. तालाचे वैविध्य, सतत जाणवणारी प्रयोगशीलता, काहीतरी अनवट व अनाकलनीय असे वेध घेण्याची प्रतिभेची झेप हे सारं सारं पाळून तन-मन गुंगून जात असे"

'कान्ते फार तुला' शास्त्रीय संगीत गाणारा बाप आणि पॉप म्युझिक गाणारा मुलगा 'कान्ते फार तुला' तसेच 'प्रिये पहा' वगैरे जुनी गाणी अभिषेकींनी पाश्च्यात्य संगीताच्या वळणाने बसवली होती. 'सोन्याची द्वारका' हे आळतेकरांचे १९३२ सालचे नाटक संगीताचा नवा साज चढऊन १९७२ साली पुन्हा रंगभूमीवर आले. त्यातील अभिषेकींनी मोजकीच गाणी निवडली व स्वरबद्ध केली. दोन धैवतांचा बिभास, धनकोनी कल्याण, अभोगी इत्यादि रागातील त्या चाली आहेत. 'कधीतरी कोठेतरी' हे कानेटकरांचे रेश्मा नावाच्या पाकिस्तानी टोळीतील गायिकेच्या जीवनावरचे नाटक आहे, ज्याचे संगीत अभिषेकींनी दिले होते. या नाटकातील 'छेडून गेले मधुर स्वर विमल, धन्य धन्य शंखराज, परब्रह्म भेटीलागी, छत आकाशाचे अशी सर्वच गाणी उत्कृष्ट आहेत आणि तेवढीच प्रसिद्ध आहेत. 'तू तर चाफेकळी' बालकवींच्या जीवनावर हे नाटक बेतले आहे. त्यातील 'जिने मला वेडा केले तिच्यावर ही फिर्याद' केशवसुतांच्या या कवितेला बुवांनी खूप सुंदर चाल दिली आहे 'महानंदा' नाटकातील १२ गाणी ज्यातील 'तूझिया चरणीचा दास' हे हेमंत रागातील गाणे अतिशय वेगळे आणि सुमधुर झाले आहे 'अमृतमोहिनी' या नाटकातही १२ गाणी अभिषेकींनी दिली. त्यातील 'होसी कैसा भ्रांत चित्त तू हे मधुरंजनी रागातील गाणे प्रतिभेचे वेगळेपण दर्शविते. 'बिकट वाट वहिवाट' या नाटकाचे संगीत लोकसंगीताशी जवळीक साधणारे संगीत होते 'हे बंध रेशमाचे' फाळणीच्या पार्श्वभूमीवर आधारित असे नाटक आहे. यात सरस्वती रागातील 'सजनबिन कैसे भई हू निरास' ह्या अभिषेकींची शब्दरचना असलेल्या त्रितालातील बंदिशीवर बेतलेले 'विकल मन आज झुरत असहाय' ही अतिशय सुंदर चाल या नाटकात योजली आहे. 'हे बंध रेशमाचे' या नाटकात अमीर हा पाकिस्तानी गायक आहे. तो हिंदुस्तानी संगीतातील वेगवेगळ्या गायकींना स्पर्श करताना दिसतो श्रीकांत

हा पाकिस्तानी हिंदु निर्वासित पतियाळा गायकी टिकवून ठेवण्याचा सतत प्रयत्न करतो अशी याची मध्यवर्ती कल्पना आहे. 'दैव किती अविचारी, छेडीयला तारा, संगीत रस सुरस, आज सुगंध आला लहरत अशी एकापेक्षा एक सरस चाली अभिषेकींनी या नाटकासाठी बांधल्या. याच नाटकात अभिषेकींनी एक ढंगदार लावणीही बांधली आहे की जी क्षमा बाजीकर (रोशन) यांनी गायली आहे.

"दिवस आजचा असाच गेला, उद्या तर याल कां?
राया अशी जवळ मला घ्याल का?"

यामध्ये दुर्गा व मांडरागाचा खुबीने वापर केला आहे.

डॉ.सुलोचना केळकर लिहितात की "भास्करबुवांच्या गोड विस्तारक्षम चाली, वझेबुवांच्या चालींतला आक्रमकपणा व उठाव आणि मास्तर कृष्णरावांच्या चालीतील लालित्य व माधुर्य या तिन्ही गोष्टींचा अपूर्व संगम आणि शिवाय नाविन्य आपल्याला पं. अभिषेकी यांच्या रचनांत दिसते." 'देणाऱ्याचे हात हजार' या नाटकात

देणाऱ्याचे हात हजार,
ते पुण्यही देती,पापही देती
तुला हवे ते तू स्विकार

या ओळींना दिलेली अभिषेकींची चाल हृदयस्पर्शी आहे.

**निष्कर्ष:**

पंडित जितेंद्र अभिषेकी यांनी अनेक घराण्यातील प्रतिभावंत कलाकार, विद्वानांकडून शास्त्रीय संगीताची तालीम घेतली होती. त्यामुळे अनेक राग-रागिण्या, अनेक भारतीय संगीतातील सांगीतिक आकृतिबंध यांचा अभ्यास व त्यावरील हुकमत यामुळे अभिषेकींनी ज्या ज्या प्रकारांना संगीत दिले ते ते प्रकार लोकप्रिय ठरले. अभिषेकींनी भारतीय संगीतातील घाट किंवा आकृतिबंध नाट्यपदांच्या चालींकरिता वापरले परंतु ते जश्याला तसे न वापरता विशिष्ट ढंगाने वापरले यामध्ये नाट्यप्रसंगाला कोणते संगीत अनुकूल आहे नाट्यपदांतील शब्द कोणते आहेत?, त्यातून कोणता भाव व्यक्त होतो?, त्या पदांना कोणत्या तालाचा वापर योग्य ठरेल? याचा नेमका विचार अभिषेकींच्या संगीतात दिसून येतो.

**संदर्भ:**

१. देशपांडे, वि.भा (संपादक): स्वराभिषेक,पं.जितेंद्र अभिषेकी सत्कार समिति,१९९३

२. दरेकर, मोहन: माझे जीवन गाणे,मधुश्री प्रकाशन, पुणे.,प्रथम आवृत्ती २००५

३. केळकर, सुलोचना: पं.जितेंद्र अभिषेकी यांचे नाट्यसंगीताला योगदान,प्रकाशक गांधर्व महाविद्यालय मंडळ,मुंबई. प्रथम आवृत्ती १९९८

४. काळे राजा: पं. जितेंद्र अभिषेकींनी संगीतबद्ध केलेल्या 'संगीत मत्स्यगंधा' नाटकातील सांगीतिक मूल्यांची चिकित्सा, संगीत कला विहार: अखिल भारतीय गांधर्व महामंडळ,मुंबई प्रकाशन,डिसेंबर २०१४